# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# बा. दे. कॉलेजकडून मराठवाडा-सोलापूर पूरग्रस्तांना मदतीचा हात

* महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

पाटण, दि. २४ ऑक्टोबर : कोयना एज्युकेशन सोसायटी संचलित बा. दे. कॉलेजने सामाजिक बांधिलकी जपत मराठवाडा आणि सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. गेल्या काही महिन्यांतील मुसळधार पावसामुळे या भागात अतिवृष्टीचे भीषण स्वरूप निर्माण झाले. हजारो घरे उद्ध्वस्त झाली, जनावरांचे आणि शेतीचे प्रचंड नुकसान झाले. त्यामुळे या भागातील नागरिकांवर आर्थिक संकट कोसळले.



या पार्श्वभूमीवर महाविद्यालयाने मानवतेचा दाखला देत पूरग्रस्त कुटुंबांना आवश्यक मदत पोहोचविण्याचा उपक्रम राबविला. महाविद्यालयातील एन.एस.एस. आणि एन.सी.सी. यांच्या माध्यमातून उपक्रम हाती घेण्यात आला. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेषतः विद्यार्थ्यांनी आपली सामाजिक जबाबदारी ओळखून मोठ्या प्रमाणावर योगदान दिले.पूरग्रस्त भागात जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाल्याने महाविद्यालयाकडून अन्नधान्य, सुके खाद्यपदार्थ या वस्तूंचे संकलन करण्यात आले. व एस.जी.एम. कॉलेज, कराड येथील संकलन केंद्रात धान्य जमा करण्यात आले. त्यानंतर ते सोलापूर आणि मराठवाडा जिल्ह्यातील आपत्तीग्रस्त भागात पाठविण्यात येणार आहे.

या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी वस्तू संकलन, वर्गीकरण आणि पॅकिंगची जबाबदारी मोठ्या उत्साहाने पार पाडली. आपत्तीच्या काळात समाजासाठी उभे राहणे हेच खरी देशसेवा आहे,फ या भावनेने प्रेरित होऊन राबविलेल्या या मोहिमेतून विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता, सहानुभूती आणि जबाबदारीची भावना दृढ झाली आहे. या उपक्रमामुळे महाविद्यालयाच्या सामाजिक कार्याचा नवा अध्याय लिहिला गेला असून, भविष्यातही अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजसेवेची प्रेरणा मिळेल, असा विश्वास प्राचार्य डॉ. एस. डी. पवार व आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. हेमलता काटे यांनी व्यक्त केला.

मदत कार्याच्या आयोजनात एन.एस.एस. प्रकल्प अधिकारी डॉ. एल. जी. गणगे, प्रा. पी. आर. गायकवाड, प्रा. बी. ए. चव्हाण, एन.सी.सी. अधिकारी डॉ. एस. पी. पाटील, डॉ. भरत जाधव, प्रा. विनायक माथणे, डॉ. एस. एस. कुंभार, एन.एस.एस. विद्यार्थी प्रतिनिधी ओमकार पवार सहकार्य केले.